# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority
# (MWRRA)

9/cc

**Suresh V. Sodal**
Secretary

9th Floor, Centre - 1, World Trade Centre,
Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel. (D): 2215 2249 (O): 2215 2019
Fax: 2215 3765
Email: mwrra@mwrra.org


धा. क्र. मजनिप्रा/२०१२/PRCL/विपाविम/८०/२४६ दिनांक : १९/०४/२०१२

**विषय : विदर्भातील खारपाण पट्टयातील चंद्रपूर (चांदई) बॅरेज ता. दर्यापूर जि. अमरावती हा प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्याबाबत...**

प्रिय श्री.

कृपया सोबत जोडलेल्या मा. श्री. रावसाहेब शेखावत, आमदार - अमरावती क्षेत्र यांचे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना विषयांकित प्रकरणी लिहिलेल्या दिनांक १७/१२/२०११ च्या पत्राचे अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये मा. राज्यपाल यांना विशेष बाब म्हणून चंद्रपूर (चांदई) बॅरेज प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्याच्या सूचना देण्यासंबंधी विनंती करण्यात आली होती.

२.० प्राधिकरणास चंद्रपूर (चांदई) बॅरेज प्रकल्प प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत मुख्य अभियंता (विप्र) अमरावती यांच्या दिनांक ०७/०४/२०१२ च्या पत्रान्वये दिनांक १२/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला आहे. प्राधिकरण, नवीन प्रकल्पांस मान्यता देतांना वेळोवेळी मा. राज्यपाल यांनी दिलेल्या निदेशांचे पालन करते.

३.० मा. राज्यपाल यांचे वित्तीय वर्ष २०१२-१३ साठीच्या निदेशातील परिच्छेद ४ आणि ५ अन्वये अमरावती जिल्ह्यामध्ये वित्तीय अनुशेष नाही पण भौतिक अनुशेष आहे असे नमूद केले आहे. तथापि सदर निदेशातील परिच्छेद १८ (अ) अन्वये सिंचन क्षेत्रातील बांधील खर्चासाठी जो प्राधान्यक्रम आहे त्यात नवीन प्रकल्प हाती घेऊन तो कमी केला जाऊ नये असे निदेश दिले

आहेत (The priority to committed expenditure in Irrigation sector should not be diluted by taking up new projects). तसेच परिच्छेद १८ (ब) अन्वये फक्त विदर्भामधील गोदावरी खोऱ्यातील सिंचन प्रकल्पांना सांविधानिक सोपस्कारासाठी प्रशासकिय मान्यता देता येईल परंतू हे प्रकल्प प्रत्यक्षात सुरु न करण्याचे निदेश दिले आहेत.

४.० तद्नुसार मा. राज्यपाल यांचे वित्तीय वर्ष २०१२-१३ साठीच्या निदेशातील परिच्छेद १८ अन्वये विषयांकित नवीन प्रकल्पास सद्यस्थितीत प्राधिकरण अधिनियमातील कलम ११(च) अन्वये मान्यता देऊ शकत नाही.

५.० परिच्छेद १ मधील पत्राच्या अनुषंगाने वरील बाब माहितीसाठी सादर.

आपला

o/c

(सु. वि. सोडळ)

सोबत - वरिलप्रमाणे

प्रति,

श्री. विकास चन्द्र रस्तोगी,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
राजभवन, मलबार हिल,
मुंबई - ४०० ०३५.